## महाराष्ट्र शासन

क्र.मग्रारो-२०१६/प्र.क्र.८५/मग्रारो-१
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
नवीन प्रशासन भवन,१६ वा मजला,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २८ नोव्हेंबर, २०१७

प्रति,

१) जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो),
तथा जिल्हाधिकारी (सर्व)
२) सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो),
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय :- समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहिरी कार्यक्रमाबाबत.**
**संदर्भ :- शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.८५/मग्रारो-१ दि.१ ऑक्टोबर,२०१६.**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये "समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण" योजनेंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहिरी कार्यक्रमाअंतर्गत राज्यात एकूण १,११,१११ इतका लक्षांक जाहीर केला आहे. उपरोक्त लक्षांकाच्या अनुषंगाने शासन पत्र क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.८५/मग्रारो-१ दि. २६ ऑक्टोबर, २०१६ अन्वये सर्व जिल्ह्यांना लक्षांक देण्यात आला आहे.

सद्यस्थितीमध्ये मनरेगाअंतर्गत सिंचन विहिरींना प्रशासकिय मान्यता देण्याचे अधिकार गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना आहेत. सदर अधिकार आता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात येत आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्ह्याचा लक्षांक पूर्ण झाल्यानंतर या कार्यक्रमाअंतर्गत अतिरिक्त सिंचन विहिरींच्या कामांना पुढील आदेशापर्यंत प्रशासकीय मान्यता देण्यात येवू नये.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**(एकनाथ डवले)**
**सचिव (रोहयो)**

प्रत:- १) सर्व विभागीय आयुक्त यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

२)आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner